# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/१९/२०१५/००७२८ दिनांक- ०७.१०.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/१९/२०१५

अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:

अपीलकर्ता

श्री. धर्मेश जैन
२४३/३३०२, म्हाडा कॉलनी,
टागोर नगर, विक्रोळी (पूर्व)
मुंबई - ४०००८३.

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | : | ०१.०९.२०१५ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | : | ०४.०९.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०९.०९.२०१५ |

माहितलेली माहिती :

1. Legal provisions for receiving the refund of amount deposited u/s 127 of the Electricity Act, 2003 & Whether interest allowed, at what rate from When.

2. Number of connections allowed to a consumer for different categories (commercial & Residential) on an affidavit acknowledge the establishments u/s 43 of the Electricity Act @ MERC Supply Code 2005

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:

Above point No. 1 & 2 are questionnaire points by which you are seeking opinion from the RTI officer. This does not come under the rights of the RTI officer.

As per RTI Act, 2005 the ***"Information" means any material in any form, including records, documents, memos, e-mails, opinions, advices, press releases, circulars, orders, logbooks, contracts, reports, papers, samples, models, data material held in any electronic form and information relating to any private body which can be accessed by a public authority under any other law for the time being in force:***

Information does not mean every information. It means only such information which is recorded and stored and disseminated by the public authority.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

## आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) -

अपीलकर्ता यांनी वरिल नमूद केलेल्या कारणांकरिता अपील दाखल केले आहे.

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २३.०९.२०१५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर होते परंतू त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. २२.०९.२०१५ च्या ईमेल द्वारे त्यांचे निवेदन सादर केले आहे व ते अभिलेखीत करण्यात आले आहे. तसेच जन माहिती अधिकारी हे वरील सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी आपले निवेदन सादर केले.

अपीलावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपीलार्थी यांना दि. ०४.०९.२०१५ रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या मुद्दा क्र.१ व २ यांना उत्तर दिलेले आहे. परंतु अपीलार्थी यांनी त्यांच्या लिखित निवेदनात माहिती अधिकारातील कलम २, ६, ८ व ९ नुसार माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद नसल्याचे म्हटले आहे.

अपीलार्थी यांच्या अपीलातील मुद्दा क्र. १ व २ संबंधाने माहिती अधिकारी यांनी मुद्दयांना अनुसरुन योग्य उत्तर / माहिती न दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. करीता माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, त्यांनी अपीलार्थी यांच्या मुद्दा क्र. १ व २ यांना माहिती अधिकारातील योग्य कलमांचा अभ्यास पूर्वक विचार करुन मुद्दा क्र. १ व २ विषयी उत्तर / माहिती अपीलार्थी यांना विनामोबदला या निर्णयापासुन १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याचा अनुपालन अहवाल अपीलीय अधिकारी यांना सादर करावा. करीता सदरहू अपील माहिती अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रतिप्रेषित करण्यात येत आहे. अपील निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

## आदेश

१) माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, त्यांनी अपीलार्थी यांच्या मुद्दा क्र. १ व २ या संबंधाने योग्य उत्तर / माहिती अपीलार्थी यांना विनामोबदला या निर्णयापासुन १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अनुपालन अहवाल अपीलीय अधिकारी यांना सादर करावा.

अपील निकाली काढण्यात येत आहे.

7.10.15

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना योग्य कार्यवाहीसाठी .